# देवगिरी नागरी सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर
**(शेड्यूल्ड बँक)**

## सेफ डिपॉझीट लॉकर्स - स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर (SOP)

प्रस्तावना:-
भारतीय रिझर्व बँकेचे पत्र क्र. आरबीआय / 2021-2022 / 86 / डीओआर.एलइजी.आरइसी /40/09.07.005/2021-22 दि. 18/08/2021 अन्वये सेफ डिपॉझीट लॉकर / सेफ कस्टडी आर्टिकल सुविधा बाबत सुधारित सुचना जारी केल्या आहेत. बँकिंग तसेच तंत्रज्ञानामध्ये झालेला विकास, ग्राहकांनी केलेल्या तक्रारीचे स्वरुप, बँका, इंडियन बँक्स असोसिएशन यांचेकडून प्राप्त झालेले अभिप्राय ह्या बाबी विचारत घेवून, भारतीय रिझर्व बँकेने सदर विषयासंदर्भात जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वे / सूचना ह्याबाबत आढावा घेतला आहे. सदर आढाव्यात मा. सर्वोच्च न्यायालयाने 'अमिताभ दासगुप्ता विरुद्ध युनायटेड बँक ऑफ इंडिया' केस मध्ये दिलेल्या तत्वांचा / निर्देशांचा समावेश केलेला आहे. सदर सुधारित सुचना विचारात घेवून, बँकांनी 'लॉकर ऑपरेशन' विषयी स्वतंत्र धोरण / मार्गदर्शक सुचना तयार कराव्यात व त्यास मा. संचालक मंडळाची मान्यता घ्यावी असे निर्देश दिलेले आहेत. सुधारित मार्गदर्शक तत्वे ही दि. 01/01/2022 पासून अंमलात आणावीत आणि प्रचलित तसेच आगामी लॉकर धारकांना लागू करावीत असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

- Ø बँका आपल्या ग्राहकांना त्यांच्या मौल्यवान वस्तु सुरक्षित ठेवण्यासाठी सेफ डिपॉझीट लॉकर / सेफ कस्टडी आर्टिकल सुविधा उपलब्ध करून देतात.
- Ø यातून ग्राहक विस्तार तसेच इतर उत्पन्न वाढीसाठी बँकांना मदत होते.
- Ø बँक आणि लॉकर धारक ग्राहक यांच्यात भाड्याने देणारा आणि भाड्याने घेणारा असे नाते असले तरी लॉकर धारकाने लॉकर मध्ये काय जिन्नस / वस्तु ठेवल्या आहेत ते बँकेला माहिती असत नाही. तथापी लॉकर धारकाने लॉकरमध्ये कोणत्याही बेकायदेशीर अथवा हानीकारक वस्तू / पदार्थ ठेवू नयेत यासाठीची पुरेशी काळजी बँके घेत असते.
- Ø यासाठी बँकेकडे सेफ डिपॉझीट लॉकर / सेफ कस्टडी आर्टिकल सुविधासाठी सर्वसमावेशक धोरण अत्यावश्यक आहे.

### भाग 1 - लॉकर्ससाठी कस्टमर ड्यू डिलीजन्स (Customer due Diligence)

1. कस्टमर ड्यू डिलीजन्स (Customer due Diligence)

1.1 - केवायसी निर्देश 2016 (केवायसी) निर्देश, 2016 (वेळोवेळी अद्यावत केलेले) चे मास्टर सर्क्युलर नुसार कस्टमर ड्यू डिलीजन्स च्या निकषांची पूर्णपणे पूर्तता केलेल्या आणि लॉकर सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत अर्ज केलेल्या विद्यमान ग्राहकांना लॉकर / सेफ डिपॉझीट सुविधा देता येईल. सदर ग्राहकाचा ऑन गोईंग कम्प्लायन्स पूर्ण करण्यात येईल.

1.2 - ज्या ग्राहकांचे बँकेशी इतर कोणतेही संबंध (रिलेशनशीप) नाहीत, अशा ग्राहकाने केवायसी निर्देश 2016 (केवायसी) निर्देश, 2016 (वेळोवेळी अद्यावत केलेले) चे मास्टर सर्क्युलर नुसार कस्टमर ड्यू डिलीजन्स च्या निकषांची पूर्णपणे पूर्तता केल्यानंतर त्यास लॉकर / सेफ डिपॉझीट सुविधा देता येईल. सदर ग्राहकाचा ऑन गोईंग कम्प्लायन्स पूर्ण करण्यात येईल. लॉकर भाड्याने घेत असलेल्या सर्व ग्राहकांकडून, ते ज्या हक्काने आणि क्षमतेने लॉकर भाड्याने घेत आहेत, त्या हक्कात / क्षमतेत त्यांचा ड्यू डिलीजन्स पूर्ण करुन घेण्यात येईल.

1.3 - लॉकरधारकाने लॉकरमध्ये कोणत्याही बेकायदेशीर अथवा हानीकारक वस्तू / पदार्थ ठेवू नयेत असा मुद्दा लॉकर ॲग्रीमेट मध्ये बँकेने अंतर्भूत करण्यात आला आहे. एखाद्या लॉकरधारकाने बेकायदेशीर अथवा हानीकारक वस्तू / पदार्थ लॉकरमध्ये ठेवले आहेत असा संशय बँकेला असल्यास, परिस्थितीनुसार योग्य ती ॲक्शन घेण्याचा अधिकार बँकेला असणार आहे.

1.4 - लॉकर धारकाचा आणि लॉकर धारकाने लॉकर वापरासाठी अधिकृत केलेल्या प्रतिनिधीचा पासपोर्ट

साईजचा फोटो बँकेने घेऊन शाखा दप्तरी जतन करण्यात येईल.

## भाग 2 - लॉकर वाटप / वितरण

2. ग्राहकांनी कळविलेल्या पसंतीनुसार, त्यांना लॉकर वाटप करता यावे ह्या दृष्टीने बँकेची रिक्त लॉकर्सची शाखानिहाय यादी तयार केली जाईल. तसेच वाटपासाठी जर लॉकर उपलब्ध नसतील तर, बँक लॉकर वाटप संदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल. सर्व अर्जदारांना पोहोचपावती तसेच प्रतीक्षा यादी क्रमांक देण्यात येईल. भारतीय रिझर्व बँकेने सायबर सिक्युरिटी बाबत घालून दिलेल्या चौकटीनुसार पूर्तता केलेल्या सीबीएस / अन्य संगणकीकृत प्रणालीत प्रतीक्षा यादी ठेवण्यात येईल जेणेकरुन लॉकर वाटप आणि लॉकर वाटप करण्याच्या प्रणालीत पारदर्शकता राहील. बँकेने लॉकर वाटप करतांना बँकेशी समाधानकारक व्यवहार असणार्या ग्राहकाला देईल. नवीन ग्राहकांची बचत किंवा चालू ठेव खाती सुरू करून घ्यावीत ज्यातून लॉकर चे वार्षिक भाडे वसूल करणे शक्य होईल.

2.1 - लॉकरच्या आदर्श कराराचे प्रारुप (मॉडेल लॉकर ॲग्रीमेट)

2.1.1 ज्या ग्राहकाला लॉकर सुविधा हवी आहे त्यांनी बँकेच्या लॉकर साठीचा विहित नमुन्यातील अर्ज, सर्वांचे स्वाक्षरी, फोटोसह सादर केला पाहिजे.

२.१. २ सेफ डिपॉझीट लॉकरसाठी बँकेचे, संचालक मंडळाची मान्यता असलेले लॉकर ॲग्रीमेट तयार करण्यात आले आहे. सदर लॉकर ॲग्रीमेंट, इंडियन बँक्स असोसिएशनच्या मॉडेल लॉकर ॲग्रीमेटच्या आधारे तयार करण्यात आले आहे. सदर ॲग्रीमेट हे सुधारित सूचना आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुरुप आहे.

2.1.३ - ग्राहकाला लॉकर वाटप करतेवेळी, ज्या ग्राहकाला लॉकर सुविधा पुरवायची आहे त्याचेबरोबर बँकेचा विधीवत शिक्का असलेल्या कागदावर करार करण्यात येईल. सदर करारासाठी वेळोवेळी लागु असलेली स्टॅम्प ड्युटी भरणा करुन घेण्यात येईल. दोन्ही पक्षांनी (बँक व लॉकरधारक) स्वाक्षरी केलेल्या लॉकर ॲग्रीमेटची एक प्रत लॉकर भाडेकरुला, त्याचे अधिकार आणि जबाबदाऱ्या जाणून घेण्यासाठी देण्यात येईल व मूळ प्रत संबधित शाखेच्या दप्तरी राहील.

२. १.४ - लॉकर धारकाला नामनिर्देशन सुविधेबद्दल माहिती देऊन त्याचे फायदे समजावून सांगावे .व नामनिर्देशनासाठी आग्रह करावा .

2.2 - लॉकर भाडे (रेंट)

२.२.१ लॉकर भाडे हे आगावुच (Advance) वसूल झाले पाहिजे. लॉकर भाड्याची, वसुलीची माहिती SMS / ईमेल द्वारे लॉकर धारकास दिली गेली पाहिजे.

२.२.२ लॉकर भाडे नियमित, वेळेवर न चूकता प्राप्त होण्यासाठी, लॉकर देतानाच बँक लॉकर धारकांकडून मुदत ठेव घेते. लॉकरचे तीन वर्षाचे भाडे तसेच आवश्यकता पडल्यास लॉकर ब्रेक ओपन करण्याचे शुल्क भरुन निघेल एवढी मुदत ठेव लॉकर वाटपाच्या वेळी घेण्याची बँकेला परवानगी आहे. लॉकर भाडेकरु लॉकरचा वापर करत नाहीत अथवा लॉकर भाडेही देत नाही, अशा परिस्थितीला काही वेळा बँकेला तोंड द्यावे लागते. अशावेळी या मुदती ठेवीचा उपयोग होतो.

2.2.३- मात्र ज्या लॉकर धारकाचे लॉकर ऑपरेशनचे व्यवहार समाधानकारक आहेत, अशा विद्यमान लॉकर धारकांकडून मुदत ठेव घेण्याचा आग्रह करण्यात येणार नाही.

2.2.४ - जर लॉकर भाडे आगावू भरलेले असेल व काही कारणाने ग्राहक निर्धारित मुदती पूर्वी लॉकर परत करत असेल तर, ग्राहकाकडून लॉकर परत घेते वेळेस, आगावू घेतलेल्या रकमेतून प्रमाणशीर रक्कम ग्राहकास परत

करण्यात येईल.

२. २.५ - लॉकर भाडे थकीत राहिल्यास बँक लॉकर operations करण्यास परवानगी देणार नाही.

2.2.6- लॉकर धारक बँकेच्या कामकाजाच्या वेळा, लॉकर सेवेच्या वेळा, सेवाशुल्क, यांच्याशी परिचित असावा.

2.2.७ - सीबीएस मध्ये सर्व नोंदी, कागदपत्रे, लॉकर भाडे या सर्व पूर्तता झाल्यावर लॉकर देण्यात यावे. लॉकरची किल्ली देण्यापूर्वी ती योग्य पद्धतीने काम करते आहे जसे कुलूप लागणे , उघडणे याची पडताळणी करूनच दिली जावी. तसेच लॉकरची किल्ली मिळाल्याबाबत व कोणतीही तक्रार नसल्याची स्वाक्षरी लॉकर धारकाची दफ्तरी घेण्यात यावी.

2.2.८ - विलीनीकरण / अवसायन / स्थलांतर इ. कारणास्तव लॉकर्सची जागा बदलण्यात येणार असेल तर, हया संदर्भात बँक, दोन वृत्तपत्रात (यात प्रादेशित भाषेतील एका स्थानिक वृत्तपत्राचा समावेश असेल.) पब्लीक नोटीस प्रसिद्ध करेल. ह्याबाबत लॉकरची जागा बदल करणे अथवा बंद करणे ह्या पर्यायांसह बँकेने ग्राहकाला दोन महिने अगोदर पूर्वसूचना देईल. नैसर्गिक आपत्तीमुळे पूर्व नियोजित नसलेले स्थलांतर अथवा काही तातडीची परिस्थिती उद्भवली असल्यास, बँक शक्य तेवढ्या लवकर ग्राहकांना सुचित करेल.

## भाग 3 - पायभूत सुविधा आणि सुरक्षिततेचे मानक

3.1. - स्ट्राँग रुम / वॉल्टची सुरक्षितता

- Ø गुन्हेगारीपासून बचाव करण्यासाठी, लॉकर सुविधा ज्या भागात ठेवण्यात आलेली आहे तो भाग योग्यरित्या सुरक्षित आहे याची खात्री करण्यासाठी बँक आवश्यक ती पावले उचलेल.
- Ø वाटप केलेल्या लॉकरकडे जाण्यासाठी, लॉकर धारकाव्यतिरिक्त अन्य व्यक्ती कोणत्याही बाजूने प्रवेश करु शकेल का ही जोखीम विचारात घेउन व तिचे निर्धारण करुन, / निश्चित करुन, नोंदी दप्तरी ठेवण्यात येतील. बँक लॉकर कक्षाचा प्रवेश मार्ग आणि बाहेर पडण्याचा एकच मार्ग निश्चित करेल.
- Ø पावसाचे / पुराचे पाणी लॉकर रुमच्या आत येवू नये व त्यामुळे नुकसान होवू नये म्हणून लॉकर्स ठेवलेली जागा पुरेशी सुरक्षित राहील याची काळजी घेईल.
- Ø आगीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या जोखीमेचेही निर्धारण करण्यात येईल व अशी जोखीम किमान राहील याबाबत बँक उपाय योजना करेल. अशा जोखीमा ओळखण्यासाठी बँक आपल्या धोरणात ठरविल्यानुसार, नियमीतपणे लॉकर्सच्या सुरक्षिततेची तपासणी करेल व आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.
- Ø नियमीत तपासणाद्वारे लॉकर- स्ट्राँग रुम / वॉल्ट मध्ये कीटक, वाळवी, ओलसरपणा, किंवा जमिनीतून पाणी पाझरत नसल्याची बँक पडताळणी करेल.
- Ø लॉकर्स ठेवलेल्या जागेत पुरेशी सुरक्षा कायम तैनात असावी यासाठी बँक सदर विषयी केलेल्या जोखीम निर्धारणानुसार आवश्यकता भासल्यास, प्रवेश नियंत्रण यंत्रणा (अॅक्सेस कंट्रोल सिस्टीम) बसवेल. ज्यामुळे अनाधिकृत प्रवेशास निर्बंध होईल आणि लॉकर रुमकडे होणाऱ्या प्रवेशाचे टाईम लॉगसह डिजीटल रेकॉर्ड तयार करता येईल. बँकेच्या अंतर्गत धोरणानुसार, स्ट्राँग रुमकडे जाणारा प्रवेश मार्ग, आणि बाहेर जाण्याचा तसेच दैनंदिन व्यवहार होणारा सामाईक भाग सीसीटिव्ही च्या निगराणीत ठेवण्यात येईल आणि सीसीटिव्हीचे 180 दिवसांचे रेकॉर्ड जतन करण्यात येईल. जर एखाद्या ग्राहकाकडून बँकेस तक्रार प्राप्त झाली की, त्याला माहिती नसताना / त्याची परवानगी नसताना, त्याचे लॉकर उघडले गेले / चोरी झाली अथवा कराराचा भंग झाल्याचे निदर्शनास आले तर अशा प्रसंगी पोलीस तपासणी पूर्ण होईपर्यंत आणि वादाचा निकाल लागेपर्यन्त , बँक सीसीटिव्ही चे रेकॉर्ड जतन करेल.

3.२ - सुरक्षिततेसंबंधीच्या कार्यपद्धतीचे योग्य दस्तऐवजीकरण करण्यात येईल, आणि संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यपद्धतीचे योग्य ते प्रशिक्षण दिलेले असेल. अंतर्गत लेखा परिक्षकांनी सुरक्षिततेसंबंधीची कार्यपद्धती तपासाणी करुन पूर्तता अहवाल सादर करतील जेणेकरुन कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन होते आहे याची खात्री होईल.

3.३ - लॉकरची मानके (Locker Standards) -

- Ø बँकेद्वारे भविष्यात स्थापित केले जाणारे सर्व नवीन यांत्रिक लॉकर्सची सुरक्षितता ही ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डस् (बीआयएस) यांनी विहीत केलेल्या मूलभूत मानके / मानदंडानुसार आहे अथवा ह्या संदर्भात लागू झालेल्या अन्य उद्योगांच्या मानकांनुसार आहे याची खात्री केली जाईल.
- Ø लॉकर / लॉकरची मालकी ओळखणे सोपे होण्याच्या दृष्टीने, सर्व लॉकर्सच्या चाव्यांवर बँकेचा / शाखेचा आयडेंटिफिकेशन कोड कोरलेला / ठसवलेला (Embossed) असेल.
- Ø शाखेत असलेल्या लॉकर्सच्या चाव्या सुस्थितीत आहेत याची तपासणी नियमीतपणे / वेळोवळी कस्टोडियन अधिकाऱ्या मार्फत करण्यात येईल.
- Ø बँकेने ग्राहकाला दिलेल्या चावीनेच लॉकर वापरण्याची परवानगी राहील. मात्र सोय / सुविधा असल्यास, ग्राहकाने त्याच्या लॉकरला अंगभूत असलेल्या कुलुपाव्यतिरिक्त अन्य कुलूप लावण्यासाठी कोणतेही बंधन राहणार नाही.

## भाग 4 - लॉकरचा वापर (Locker Operations)

4.1 ग्राहकाकडून होणारा नियमीत वापर -

- Ø लॉकरधारक अथवा लॉकरधारकाने अधिकृत करुन दिलेल्या प्रतिनिधीलाच, त्यांच्या ओळखीची योग्य पडताळणी आणि बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याची पडताळणी आणि रेकॉर्डिंगनंतरच लॉकर चालविण्याची/ वापरण्याची परवानगी दिली जाईल.
- Ø बँकेने सर्व व्यक्तिंच्या तसेच लॉकरधारकांनी ज्या तारखांना लॉकरचे व्यवहार केले आहेत / वापरले आहेत त्या तारखा, वेळा, (येण्यांच्या व जाण्याच्या) त्यांची स्वाक्षरी याबाबतच्या नोंदा अद्यावत ठेवल्या पाहिजेत.
- Ø स्ट्रॉंग / वॉल्ट रुमच्या भागात होणारा व्यक्तिंचा वावर, बाबतच्या नोंदी जतन करण्याच्या दृष्टीने लॉकर रुम मध्ये प्रवेश करण्याच्या तसेच बाहेर पडण्याच्या लॉकरधारकांच्या तसेच बँक कर्मचारी व अन्य व्यक्तिंच्या नोंदी, त्यांच्या स्वाक्षरी याचे रजिस्टर ठेवले जाईल. तसेच लॉकर व्यवहारांची नोंद बँकेचा संगणक प्रणाली मध्ये घेतली जाईल.
- Ø लॉकर धारकाला लॉकर रुममध्ये प्रवेश देण्यासाठी नियुक्त असलेल्या बँकेचा अधिकृत अधिकारी, लॉकर उघडण्यासाठी पहिली चावी वापरेल व नंतर लॉकरधारक जेव्हा लॉकर उघडेल त्यावेळी अधिकारी तेथे उपस्थित राहणार नाही. लॉकरधारकाला लॉकर वापरताना पुरेसा खाजगीपणा मिळेल याची बँकेने काळजी घेईल. लॉकर बंद करतांना पहिल्या चावीची गरज नसते. त्यामुळे लॉकर धारकाने त्याच्याच चावीने लॉकर लॉक करायचे असते.
- Ø लॉकरधारकाने लॉकरमध्ये कोणत्याही बेकायदेशीर अथवा हानीकारक वस्तू / पदार्थ ठेवू नयेत असा मुद्दा लॉकर ॲग्रीमेंट मध्ये बँकेने अंतर्भूत करण्यात आला आहे. एखाद्या लॉकरधारकाने बेकायदेशीर अथवा हानीकारक वस्तू / पदार्थ लॉकरमध्ये ठेवले आहेत असा संशय बँकेला असल्यास, परिस्थितीनुसार योग्य ती ॲक्शन घेण्याचा अधिकार बँकेला असणार आहे.
- Ø लॉकरधारकास बँकेने दिलेल्या चावीद्वारेच लॉकर वापरता येईल. जर लॉकरधारकाने चावी हरवली असेल तर त्याची माहिती कोणतीही दिरंगाई न करता लिखित स्वरुपात बँकेस कळवली पाहिजे.
- Ø कामकाजाचा दिवस संपण्यापुर्वी, बँकेने लॉकरधारकास त्याचे रजिस्टर्ड इ मेल आयडीवर / मोबाईल नंबरवर इ-मेल/ मेसेज पाठविला जाईल, ज्यात लॉकर व्यवहाराची तारीख व वेळ याची माहिती उपलब्ध असेल.
- Ø लॉकर ऑपरेशन झाल्यानंतर / लॉकर वापरल्यानंतर, लॉकर योग्य रितीने बंद झाले आहे की नाही हे कस्टोडियन अधिकाऱ्याने तपासेल, असे झाले नसल्यास, लॉकर त्वरीत बंद करण्यासाठी लॉकरधारकास तात्काळ नोंदणीकृत इ मेलद्वारे / नोंदणीकृत मोबाईलवर मेसेज द्वारे / पत्राद्वारे/फोनव्दारे कळविण्यात येईल, जेणेकरुन लॉकरधारक तपासणी करेल व लॉकरमध्ये ठेवलेल्या जिन्नस / वस्तूंमध्ये काही फरक असेल तर त्याला कळेल. लॉकर व्यवस्थितरित्या बंद केले गेले नाही ही बाब कस्टोडियन अधिकारी रजिस्टरमध्ये दिनांक व वेळ नमूद करेल. यानंतर दिवसाअखेर कस्टोडियन अधिकारी लॉकर रुम मध्ये प्रत्यक्ष जावून, लॉकर्स व्यवस्थितरित्या बंद झाले आहेत आणि कामकाजाचे

तास संपल्यानंतर चूकून एखादी व्यक्ती लॉकर रुम मध्ये अडकली नाही याची खात्री करेल.

4.2 - बँकाद्वारे अंतर्गत नियंत्रण:
4.2.1 - रिझर्व्ह बँकेने निर्धारीत केलेल्या सायबर सुरक्षा फ्रेमवर्क्सची पूर्तता केलेल्या कोअर बँकिंग सिस्टीम मध्ये / अन्य संगणक प्रणालीत लॉकर रजिस्टर आणि लॉकरच्या चाव्यांचे रजिस्टर जतन करण्यात येईल. लॉकर वाटपाच्या बाबतीत काही बदल असल्यास, त्या बदलांसह लॉकर रजिस्टर अद्यावत ठेवण्यात येईल.

## भाग 5 - नामनिर्देशन सुविधा आणि दावे निकाली काढणे

5.1 - नामनिर्देशन सुविधा
5.1.1 - बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट 1949 च्या कलम 45-झेडसी ते 45-झेड एफ, बँकिंग कंपनीज (नॉमिनेशन) रुलस् , 1985/को-ऑपरेटिव्ह बँक्स (नॉमिनेशन) रुलस् 1985च्या तरतुदीनुसार सेफ डिपॉझीट लॉकर आणि सेफ कस्टडी ऑफ आर्टिकल्स यांना नामनिर्देशनाची सुविधा बँक उपलब्ध करुन देईल. नामदिर्नेशित व्यक्ती अ-[illegible]न असेल तर, बँकेत खाते उघडण्यासाठीची जी विहीत कार्यपद्धती आहे, त्याच पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. ग्राहकाने साक्षांकित केलेला, नामनिर्देशित व्यक्तिचा पासपोर्ट साईजचा फोटो घ्यावा व दप्तरी जतन केला जाईल. वैयक्तिक नावाने असलेले तसेच संयुक्त नावाने असलेल्या लॉकर्सना नामनिर्देशन सुविधेचा लाभ घेता येईल.

5.1.2 - बँकिंग कंपनीज (नॉमिनेशन) रुलस् , 1985/को-ऑपरेटिव्ह बँक्स (नॉमिनेशन) रुलस नुसार विहीत केलेले विविध फॉर्मस्, अंगठा उमटविलेला असेल तरच सदर फॉर्म हे साक्षीदारांकडून साक्षांकित करुन घेतला जाईल. खातेधारकाची स्वाक्षरी साक्षीदारांकडून साक्षांकित करण्याची आवश्यकत नाही.

5.1.3 - लॉकरधारकाचे नामनिर्देशन नोंदणीकृत करावयाचे असल्यास / रद्द करावयाचे असल्यास / काही फरक असल्यास, सदर नोंदी करण्याची बँकेची योग्य अशी कार्यप्रणाली व कार्यपद्धती असेल.
5.1.4 - लॉकरधारकाचे नामनिर्देशन नोंदणीकृत करण्याचा / रद्द करण्याचा / काही फरक असल्यास सदर फरक असल्यास त्याची नोंद घेणारा फॉर्म लॉकरधारकाकडून मिळाल्यानंतर, अशया फॉर्मची पोहोच पावती देण्याची बँकेची कार्यपद्धती असेल. त्याची पोहोच पावती सर्व ग्राहकांना देण्यात येईल.

5.2 - ग्राहकाचा मृत्यू झाल्यास निकाली काढावयाचे दावे:

5.2.1 - दावे निकाली काढण्याबाबत, बँकेचे संचालक मंडळाचे मान्यताप्राप्त धोरण आहे. सदर धोरण हे नियामकांच्या सुचनांची आणि इंडियन बँक्स असोसिएशन यांच्या मॉडेल ऑपरेशनल प्रोसीजर ची पूर्तता करणारे असेल.

5.2.2 - लॉकरसाठी नामनिर्देशन आणि त्यातील जिन्नस / वस्तू नामनिर्देशित व्यक्तिला देण्याबाबत तसेच बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट 1949 च्या कलम 45-झेडसी ते 45-झेड एफ, बँकिंग कंपनीज (नॉमिनेशन) रुलस् , 1985/को-ऑपरेटिव्ह बँक्स (नॉमिनेशन) रुलस् 1985, इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट आणि इंडियन सक्शेशन ॲक्टच्या तरतुदीनुसार अन्य व्यक्तिने क्लेमबाबत केलेल्या नोटीसप्रती संरक्षण मिळण्याची, संचालक मंडळाची मान्यताप्राप्त असलेले बँकेचे धोरण असेल.

5.2.3 - लॉकर मधील चीज वस्तू खरोखरच नामनिर्देशित व्यक्तिंनाच परत केल्या गेलया आहेत याची खात्री करण्यासाठी तसेच लॉकर धारकाचा मृत्यू झाला आहे याची तपासणी करण्यासाठी मयत दावा निकाली काढण्याचा बँकेचा स्वत:चा एक विहीत नमुना असेल.
वैयक्तिक लॉकर धारकाने नामनिर्देशन केले असेल तर ग्राहकाचे मृत्यू प्रमाणपत्र, नामनिर्देशित व्यक्तीची ओळख पटविणार्या कागदपत्रांची पडताळणी करून बँक नामनिर्देशित व्यक्तिला लॉकर वापरण्याची, त्यातील चीज वस्तु काढून नेण्याची परवानगी देईल.

5.2.4 - दावा निकाली काढण्यासाठी काल मर्यादा -
लॉकरमधील चीजवस्तू नामनिर्देशित व्यक्तिला अथवा हयात संयुक्त लॉकरधारकाला परत करण्यासाठी, दावा दाखल झाल्याच्या तारखेपासून, बँकेच्या नियमानुसार, मृत्यु झाल्याचा पुरावा आणि ओळखीबाबतची योग्य कागदपत्रे सादर केल्यानंतर 15 दिवसात बँने मयत लॉकरधारकाचा दावा निकाली काढण्यात येईल.

5.2.5 - ठराविक कालावधीनंतर, मयत लॉकरधारकाचे दावे तसेच कालमर्यादा उलटून गेलेल्या प्रलंबित खात्यांचा, विलंब होण्याच्या कारणासह निकाली काढलेल्या एकूण दाव्यांचा तपशील बँकेच्या संचालक मंडळ सभेस ठराविक कालावधीनंतर सादर करेल. बँकेचे संचालक मंडळ सदर निकाली काढलेल्या मयत दाव्यांचा आढावा घेईल. कायदेशीर कार्यवाहीमुळे न्यायालयात प्रलंबित असलेले दावे तसेच दावा सादर करण्यासाठी खऱ्या व योग्य व्यक्तिची ओळख न पटलेले दावे वगळता सर्व दावे शक्य तेवढ्या लवकर निकाली काढण्यासंदर्भात सुचना देण्यात येतील.

5.3 सेफ डिपॉझीट लॉकर कडे जाण्यासाठी प्रवेश तसेच सेफ कस्टडी आर्टिकल परत करणे -
जर एकमेव लॉकर भाड्याने घेतलेल्या लॉकरधारकाने लॉकरमधील सामान / चीज वस्तू प्राप्त करण्यासाठी एका व्यक्तिला नामनिर्देशित केले असेल तर, मृत्यू प्रमाणपत्राच्या पडताळणीनंतर आणि सदर व्यक्तिचा खरेपणा व ओळख पटल्याचे समाधान झाल्यानंतर लॉकरमधील सामान / चीजवस्तू काढून घेण्याचे स्वातंत्र्य बँक सदर नामनिर्देशित व्यक्तिला देईल.

- Ø जर लॉकर संयुक्तधारकांनी भाड्याने घेतलेले असेल, संयुक्त सहीने लॉकरचे व्यवहार करण्याच्या सूचना असतील, आणि लॉकरधारकांनी अन्य व्यक्तिला नामनिर्देशित केलेले असेल, अशा प्रकरणात कोणाही एका लॉकर धारकाचा मृत्यू झाला तर बँक हयात संयुक्त लॉकरधारक आणि नामनिर्देशित व्यक्ति अशा दोघांनाही एकत्रितपणे लॉकर साठी प्रवेश देण्याचा व त्यामधील सामान / चीजवस्तू काढून घेण्याचे स्वातंत्र्य देईल.
- Ø जर लॉकर संयुक्तपणे सर्व्हायवरशीप क्लॉजसह भाड्याने घेतले असेल आणि संयुक्त अथवा हयात संयुक्त लॉकरधारक, / संयुक्त लॉकरधारकांपैकी कोणी एक अथवा हयात लॉकरधारक, / पहिला लॉकरधारक अथवा हयात संयुक्त लॉकरधारक अथवा बँकिंग रेग्युलेशन कायदा 1949 च्या तरतुदीनुसार मान्यता असलेल्या सर्व्हायवरशीप क्लॉजनुसार लॉकर वापरण्याच्या सूचना असल्यास, कुणीही एक लॉकरधारक अथवा संयुक्त लॉकरधारक यांच्या मृत्युच्या वेळी जे अधिकारपत्र दिले असेल त्याप्रमाणे बँक कार्यवाही करेल.

5.3.2 - तथापि, नामनिर्देशित व्यक्ति / हयात लॉकरधारक यांना लॉकर वापरण्यासाठी प्रवेश देण्यापुवी बँक खालील बाबीची खात्री करेल.
1) हयात लॉकरधारक / नामनिर्देशित व्यक्तिच्या ओळखीबाबत योग्य ती काळजी आणि सावधानता बाळगेल तसेच लॉकरधारकाच्या मृत्यूची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक / योग्य त्या दस्तऐवज प्राप्त करुन घेईल.
2) मयत लॉकरधारकाच्या लॉकर वापरण्यासाठी प्रवेश देण्यासंदर्भात न्यायालये / मंच यांनी काही प्रतिबंध घातल्याचे आदेश आहेत का याची प्रयत्नपूर्वक काळजी घेतली जाईल.
3) मयत लॉकरधारकाच्या कायदेशीर वारसांचे विश्वस्त म्हणून मयत लॉकरधारकाचे लॉकर वापरण्यासाठी प्रवेश / परवानगी दिली आहे अर्थात हयात लॉकरधारक / नामनिर्देशित व्यक्तिंव्यतिरिक्त लॉकर वापरण्यासाठी ज्यांना अधिकार दिलेले आहेत अशा व्यक्तिच्या हक्कांवर कोणतीही बाधा येणार नाही याची स्पष्ट कल्पना हयात लॉकरधारक / नामनिर्देशित व्यक्तिस देण्यात येईल.

5.3.3 - नामनिर्देशित व्यक्ति अज्ञान असल्यास, त्याचे वतीने ज्या व्यक्तिस लॉकरमधील चीज वस्तू सुपुर्द करावयाच्या आहेत, अशी व्यक्ति कायद्याच्या दृष्टीने सदर चीज वस्तू स्विकारण्यासाठी सक्षम आहे का याची खात्री बँक करेल. बँक दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत चीजवस्तू किती आहेत याची यादी करेल.सदर दोघांपैकी, एक बँकेचा अधिकारी असेल जो लॉकर सुविधा / सेफ डिपॉझीट आर्टिकल्स सुविधेशी संबंधित नाही, आणि दुसरी व्यक्ति ती असावी जी आज्ञानाच्या वतीने चीजवस्तू स्विकारणार आहे अथवा जी नामनिर्देशित व्यक्ति असेल.

5.3.4 – आज्ञानाच्या वतीने लॉकरमधील चीजवस्तू स्विकारणाऱ्या व्यक्तिकडून / नामनिर्देशित व्यक्तिकडून 'लॉकरमधील मधील सर्व चीजवस्तू मिळाल्या आहेत, लॉकर रिकामे आहे आणि सदर लॉकर अन्य कोणत्याही ग्राहकाला वाटप करण्यास त्यांची काहीही हरकत नाही' ह्या आशयाचे लेखी निवेदन बँक दप्तरी घेईल.

5.3.5 - मयत लॉकरधारक असलेल्या लॉकरच्या हयात संयुक्त धारकास / नामनिर्देशित व्यक्तिला लॉकरला प्रवेश देताना / व्यवहार करु देण्यास परवानगी देताना, नामनिर्देशनात काही तफावत नसतील तर, अशा व्यक्तिला सक्सेशन सर्टिफिकेट, प्रशासनाचे पत्र, प्रोबेट इ. अथवा इंडेम्निटी बाँड देण्यासाठी बँक आग्रह करणार नाही. अशा वेळी परिच्छेद 5.3.2 अंतर्गत ज्या सूचना देण्यात आलेल्या आहेत त्याची बँक नोंद घेईल.

5.3.6 - क्लिअर सर्व्हायवरशीप क्लॉजद्वारे एक अथवा एकापेक्षा जास्त हयात संयुक्त लॉकरधारकांना लॉकर वापरणे / लॉकरसाठी प्रवेश दिला जावा ह्यासंदर्भात मयत लॉकरधारकाने नामनिर्देशन केलेले नसल्यास, अथवा सदर लॉकरच्या संयुक्त लॉकरधारकाने अधिकारपत्र दिलेले नसेल तर, मयत लॉकरधारकाच्या कायदेशीर वारसास / कायदेशीर प्रतिनिधीस लॉकर वापरण्यासाठी प्रवेश देणे सोयीचे होण्याच्या दृष्टीने बँक संचालक मंडळाच्या मान्यताप्राप्त धोरणाचा अवलंब करेल. अशा प्रकरणात बँक परिच्छेद क्र. 5.3.2 मधील सुचनांची नोंद घेईल.

## भाग 6 - लॉकर बंद (बँकेस परत करणे) करणे

६.१ लॉकर परत बँकेस स्वाधीन करतांना सर्व लॉकरधारकानी बँकेत प्रत्यक्ष येऊन स्वाक्षरीत लेखीअर्जाद्वारे विनंती केली पाहिजे.

- Ø मात्र तत्पूर्वी लॉकर भाड्याची थकबाकी असल्यास ती पूर्ण भरली पाहिजे. त्याशिवाय लॉकर उघडणे , जिन्नस परत करणे यास परवानगी नाही.
- Ø नेहमीप्रमाणे रजिस्टर मधील नोंदी सह सर्व पूर्तता केल्या जातील.
- Ø लॉकर मधील सर्व चीजवस्तु काढून घेतल्यानंतर लॉकर धारक मूळ चावी कस्टोडियन कडे परत करेल. कस्टोडियन चावी , चावी क्रमांक पडताळणी करून घेऊन चावी सील करून दफ्तरी ठेवेल.
- Ø अधिकची दक्षता म्हणून लॉकर योग्य रितीने बंद झाले आहे की नाही हे कस्टोडियन अधिकारी तपासेल. असे झाले नसल्यास, लॉकर त्वरीत बंद करण्यासाठी लॉकरधारकास तात्काळ नोंदणीकृत इ मेलद्वारे / नोंदणीकृत मोबाईलवर मेसेज द्वारे / पत्राद्वारे/फोनव्दारे कळविण्यात येईल,
- Ø लॉकर भाडे आपण आगाऊ ( Advance ) घेतलेले असते. जर मध्येच लॉकर परत केले जात असेल तर तदनुसार त्यापुढील भाडे लॉकर धारकास परत केले पाहिजे.
- Ø लॉकरसाठी घेतलेल्या ठेव पावतीवरील बँकेचा बोझा रद्द करून पावती परत केली पाहिजे. ठेव पुढे कायम ठेवायची किंवा काढून घ्यायची याचा निर्णय ठेवीदार घेतील.
- Ø लॉकर धारकाने लॉकर परत केल्यास, लॉक इंटरचेंज करण्याची सुविधा असेल. (There shall be a system of inter change of locks whenever the locker is surrendered by the hirer.) रिक्त झालेल्या लॉकरच्या चाव्या अधिकाऱ्याच्या कस्टडीत कुलूपबंद पेटीत ठेवल्या जातील. डुप्लीकेट मास्टर चाव्या बँकेच्या अन्य शाखेत ठेवल्या जातीला. ज्या अधिकाऱ्याकडे लॉकर्सच्या चाव्यांचा ताबा नाही अथवा त्याचा संबंध नाही, अशा अधिकाऱ्याकडून रिक्त झालेले / परत केलेले लॉकर्स व चाव्यांची अचानक पडताळणी व तपासणी बँके ठराविक अंतराने करेल. सदर अचानक पडताळणी व तपासणी केल्याची योग्य ती नोंद ठेवण्यात येईल.

६.२ लॉकर ब्रेक ओपन व चीजवस्तू सुपूर्द करणे / देणे

नेहमीप्रमाणे, मूळ चावी अथवा पासवर्डचा उपयोग करुन लॉकर ऑपरेट न होता, खालील परिस्थितीत वेगळ्या पद्धतीने म्हणजे ब्रेक ओपन करुन लॉकर ऑपरेट करणे ह्या पद्धतीशी संबंधित भाग 6.2 आहे.
परिस्थिती:
जर लॉकरधारकाने चावी हरवली असेल आणि त्याचे स्वत:चे जबाबदारीवर लॉकर ब्रेक ओपन करण्याची त्याने विनंती केली असेल तर.
लॉकरधारकाकडून पुरेसे सहकार्य मिळत नसल्यामुळे आणि बँकेच्या करारातील अटी व शर्तीची / नियमांची पूर्तता लॉकरधारक करीत नसल्यामुळे लॉकर परत घ्यावयाचे असेल तर.

वरील सर्व परिस्थितीत, कायदेशीर आणि करारात्मक तरतुदी विचारत घेता, लॉकर ब्रेक ओपन करण्यासाठी, बँकेचे, संचालक मंडळाची मान्यता असलेले धोरण तसेच स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर असेल.

6.२.1. - ग्राहकाच्या विनंतीनुसार लॉकरमधील चीजवस्तू सुपुर्द करणे.
6.२.२ – बँकेने दिलेली चावी लॉकरधारकाडून हरवली तर, लॉकरधारकाने बँकेला त्वरीत कळवावे. चावी हरवली आहे आणि सापडलयास बँकेला परत करेन अशा आशयाचे लेखी निवेदन बँक लॉकरधारकडून घेईल. लॉकर उघडणे, लॉक बदलणे आणि दुसरी चावी देणे हयासाठीचा खर्च लॉकरधारकाकडून वसूल केला जाईल. त्यासाठी लागु असलेले शुल्क बँक लॉकर धारकास कळविल.
6.२.३ - लॉकरधारकाची योग्य ओळख, चावी हरवल्याबाबतची सत्यता पडताळून पाहिल्यानंतर, आणि लॉकरधारकाने ब्रेक ओपन करण्यासंदर्भात दिलेले लेखी निवेदन अधिकृत केल्यानंतर लॉकर उघडण्याची प्रक्रीया बँक अधिकृत तंत्रज्ञाकडून करेल. यासाठीचा सर्व खर्च लॉकरधारकाने करावयाचा आहे.
6.२.४ - बँकेचा अधिकृत अधिकारी आणि ग्राहक यांचे उपस्थितीत ही प्रक्रीया करण्यात येईल. सदर ब्रेक ओपन प्रक्रीयेदरम्यान, लगतच्या कुठलल्याही लॉकरवर काही परिणाम होणार नाही आणि लॉकरमधील चीजवस्तू लॉकरधारकाखेरीज अन्य कोणत्याही व्यक्तिस दिसणार नाही याची काळजी बँक घेईल.
६.२.५ - ब्रेक ओपन प्रक्रीयेदरम्यान लॉकरधारक व्यक्तिश: उपस्थित राहतील.
६.२.६ - हरवलेली चावी लॉकरधारकास किंवा त्रयस्थ व्यक्तीस सापडल्यास व ती त्यांनी बँकेस परत केल्यास ती कस्टोडियन व शाखाधिकारी यांच्या समक्ष नष्ट केली पाहिजे. तशी नोंद बँकेच्या दफ्तरी ठेवण्यात यावी.

6.३ - सक्त वसुली अधिकाऱ्याकडून लॉकर - सेफ कस्टडी जप्त करणे आणि त्यातील चीजवस्तू / सामान ताबा मिळवणे.
न्यायालयाच्या / अन्य सक्षम अधिकाऱ्याच्या आदेशानुसार लॉकर / सेफ कस्टडीमधील चीजवस्तू / सामान जप्त होणार असेल आणि त्याचा ताबा घेण्यात येणार असेल, तर अशा कार्यवाहीच्या वेळी बँकेने संबंधितांना आदेश लागू करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यासाठी सहकार्य करेल.

6.३.1 - लॉकरमधील चीज वस्तू / सामान जप्त करणे आणि ताबा देणे यासंदर्भात मिळालेल्या आदेशाची आणि दस्तऐवज याची बँक तपासणी करेल. लॉकरमधील चीजवस्तूंची जप्ती आणि ताबा घेण्यासाटी शासकीय अधिकाऱ्यांनी बँकेस संर्फा केला आहे अशी माहिती ग्राहकास नोंदणीकृत मेल आयडी/ मोबाइल वर मेल / एसएमएसद्वारे / पत्राव्दारे बँक लॉकरधारकास देईल. शासकीय अधिकारी आणि दोन स्वतंत्र साक्षीदार आणि बँकेचे दोन अधिकारी यांच्या समक्ष तसेच त्यांच्या स्वाक्षरीसह लॉकरमधील चीजवस्तूंची यादी तयार करण्यात येईल. बँकेच्या दप्तरी असलेल्या लॉकरधारकाचे पत्यावर, संबंधित लॉकरधारकाला सदर यादीची प्रत पाठविण्यात येईल अथवा प्रत्यक्ष देऊन त्याची पोहोच घेण्यात येईल.

6.३.2 - कायद्याने परवानगी असल्यास, लॉकर ब्रेक ओपन करण्याच्या व त्यातील चीजवस्तूंचे मुल्यमापन प्रक्रियेचा व्हीडीओ रेकॉर्ड करण्यात येईल जेणेकरुन भविष्यात काही तंटा उद्भल्यास, न्यायालय अथवा अपहार प्रकरणात पुरावा म्हणून सादर करण्यासाठी जतन करुन ठेवला जाईल.

६.४ लॉकरधारकाकडून पुरेसे सहकार्य मिळत नसल्यामुळे आणि बँकेच्या करारातील अटी व शतीची / नियमांची पूर्तता लॉकरधारक करीत नसल्यामुळे लॉकर परत घ्यावयाचे असेल तर वरील सर्व परिस्थितीत, कायदेशीर आणि करारात्मक तरतुदी विचारत घेता, लॉकर ब्रेक ओपन करण्यासाठी, बँकेचे, संचालक मंडळाची मान्यता असलेले धोरण तसेच स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर असेल.

६.५ - लॉकर भाडे अदा न केल्यामुळे लॉकर मधील चीजवस्तू ताब्यात देणे / सुपुर्द करणे.

- Ø सलग तीन वर्षे लॉकरचे भाडे अदा न केलेल्या लॉकरधारकाचे लॉकर ब्रेक ओपन करण्याचा अधिकार बँकेला राहील.
- Ø लॉकर वाटपाबाबत कोणताही बदल करण्यापुवी बँक विद्यमान लॉकरधारकाला सुचित करेल. त्याने लॉकरमध्ये ठेवलेल्या चीजवस्तू लॉकरधारकास परत करुन त्याची पोहोच दप्तरी घेण्यात येईल.
- Ø बँकेने लॉकरधारकास लॉकर भाडे थकबाकीची योग्य लेखी सूचना पत्राद्वारे बँकेकडे असलेल्या पत्यावर

तसेच नोंदणीकृत मेल आय डी वर ईमेल द्वारे अथवा मोबाईलवर देईल. पुरेशी संधी देऊन त्याने लॉकरमध्ये ठेवलेल्या चीजवस्तू काढून घ्याव्यात यासाठी सूचना द्यावी.

- ठराविक कालावधीने लॉकरधारकास लॉकर भाडे थकबाकीची स्मरणपत्रे देण्यात याव्यात व थकीत भाडे भरणा करण्यास सूचित करावे.
- थकीत भाडे वसुलीसाठी बँकेच्या अधिकार्यांनी लॉकरधारकास प्रत्यक्ष भेटले पाहिजे.
- बँकेने लॉकरधारकास पुरेशी संधी देऊन त्याने लॉकरमध्ये ठेवलेल्या चीजवस्तू काढून घ्याव्यात यासाठी सूचना द्यावी.
- बँकेने पाठवलेले पत्र परत आले अथवा लॉकरधारकाचा शोध लागला नाही तर, लॉकरधारकास लॉकरमधील चीजवस्तू घेण्यासाठी योग्य ती मुदत देवून, बँक दोन वृत्तपत्रात पब्लीक नोटीस प्रसिद्ध करेल.(एक नोटीस इंग्रजी वृत्तपत्रात व एक स्थानिक भाषेतील वृत्तपत्रात) बँक अधिकारी आणि दोन स्वतंत्र साक्षीदार यांच्या उपस्थितीत लॉकर ब्रेक ओपन करण्यात येईल . इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उघडणाऱ्या लॉकर (स्मार्ट वॉल्टस् समाविष्ट ) च्या बाबतीत, लॉकर उघडण्यासाठी, वरिष्ठ अधिकाऱ्याला वॉल्ट ॲडमिनीस्ट्रेटर पासवर्डचा देईल व त्याबाबतच्या नोंदी दप्तरी जतन करण्यात येतील.
- लॉकर धारकाचे अनुपस्थितीत लॉकर ब्रेक ओपन करावे लागल्यास ते शाखाधिकारी, कस्टोडियन , बँकेचे वकील / नोटरी , लॉकर उत्पादक, अन्य दोन व्यक्ती ( बँकेच्या कर्मचार्यांव्यतिरिक्त) यांच्या समक्ष ब्रेक ओपन करावे.
- बँक, लॉकर ब्रेक ओपन करण्याच्या व त्यातील चीजवस्तूंचे मुल्यमापन प्रक्रियेचा व्हीडीओ रेकॉर्ड करील व तो पंचनामा म्हणून जतन करेल जेणेकरुन भविष्यात काही तंटा उद्भवल्यास, न्यायालय अथवा अपहार प्रकरणात पुरावा म्हणून सादर करता येईल. चीजवस्तूंचे मुल्यमापन बँकेच्या पॅनल वरील मूल्यांकनकाकडून केले जाईल. लॉकर रजिस्टर व्यतिरिक्त, कोअर बँकिंग सिस्टीममध्ये अथवा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सायबर सिक्युरिटी फ्रेमवर्कची पूर्तता केलेल्या अन्य कोणत्याही संगणक प्रणालीत लॉकर ब्रेक ओपन केल्याच्या प्रक्रीयेचा तपशील व्यवस्थित राहील याची खात्री बँक घेईल. लॉकर ब्रेक ओपन केल्यानंतर त्यातील चीजवस्तू, यादीसह सीलबंद पाकीटात फायरप्रुफ तिजोरीत आवर्जून ठेवण्यात येतील.
- लॉकरमधील चीजवस्तू लॉकरधारकास परत करताना, भविष्यात काही तंटा उद्भवू नये ह्या दृष्टीने लॉकरधारकाकडून, चीजवस्तूच्या यादीवर पोहोच घेण्यात येईल.
- लॉकर ब्रेक ओपन झाल्यानंतर, आणि दावा निकाली काढण्याच्या प्रक्रीयेदरम्यान तयार केलेली चीजवस्तुंची यादी, सदर परीपत्रकात शेवटी दिलेल्या योग्य त्या नमुन्यात घेण्यात येईल. कायद्यानुसार आवश्यकता नसेल तर, नामनिर्देशित व्यक्तीला / लॉकरधारकाचे हयात वारसाला, बँकेच्या लॉकरमध्ये सापडलेले सीलबंद / बंद पाकीटे देताना बँक उघडणार नाही.

६.५.१ - दीर्घ मुदतीसाठी लॉकर अक्रियाशील (निष्क्रीय) राहील्यास चीजवस्तूंचा ताबा देणे.
सात वर्षे लॉकरमध्ये व्यवहार झाले नाही / लॉकर अक्रियाशील (निष्क्रीय) राहिले आणि लॉकरधारकाचा शोध लागला नाही, अगदी लॉकर भाडे अदा झालेले असले तरीही, लॉकरमधील चीजवस्तू नामनिर्देशित व्यक्तिला / कायदेशीर वारसांना पारदर्शी पद्धतीने देण्याची मुभा बँकेला राहील. लॉकर ब्रेक ओपन करण्यापुवी बँक परिच्छेद क्र. 6 आणि ७ मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करील. दीर्घ मुदतीनंतरही मागणी न झालेल्या चीजवस्तुंचा ताबा देण्याच्या वरील प्रक्रीयेचा समावेश लॉकर ॲग्रीमेट मध्ये समाविष्ट केला आहे याची खात्री बँक करेल.

६.५.२ - दीर्घ मुदतीसाठी लॉकर अक्रियाशील (निष्क्रीय) राहीले तर लागू असणाऱ्या योग्य त्या अटी व शर्ती लॉकर ॲग्रीमेटमध्ये नमूद केलेल्या आहेत याची खात्री बँक करेल. बँकेला उत्तरदायित्वातून मुक्त करण्यासाठी, लॉकर निष्क्रीय आहे, लॉकर बँकेने उघडले आहे, त्यातील चीजवस्तू दिल्या गेलल्या आहेत, कायद्यानुसार तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या सुचना आणि लॉकर ॲग्रीमेटमधील विहीत अटीनुसार त्यातील चीजवस्तू दिलल्या गेलल्या आहेत असे कलम लॉकर ॲग्रीमेटमध्ये समाविष्ट करता येईल.

## भाग 7 - भरपाईचे धोरण / बँकेची देयता

बँकेची देयता -
लॉकरची व्यवस्थित काळजी घेणे ही बँकेची स्वतंत्र जबाबदारी असल्याने, बँकेच्या निष्काळजीपणा मुळे लॉकरचे काही नुकसान झाल्यास, अथवा लॉकरमधील चीजवस्तुंना काही हानी पोहोचल्यास, बँकेची जबाबदारी काय असेल याबाबतचे विस्तृत धोरण मा. संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येईल. ह्यात लॉकर वापराची योग्य कार्यपद्धती, लॉकर रुममध्ये अनाधिकृत प्रवेश होण्यापासून संरक्षण आणि चोरी व दरोड्यांपासून संरक्षण होण्यासाठी सुरक्षेच्या योग्य´त्या उपाययोजना याचा समावेश असेल. लूटमारी, दरोडा, चोरी, आणि चोरी करण्याच्या उेशाने घुसखोरी यांसारख्या घटनांचा अहवाल सादर करण्याच्या दृष्टीने भारतीय रिझर्व बँकेच्या मास्टर सर्क्युलरचे बँकांनी कटाक्षाने पालन करेल.

7.1 - भूकंप, पूर, वादळ, वीज पडणे ह्यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे निर्माण होणारे अथवा ग्राहकाच्या वैयक्तिक निष्काळजीपणामुळे निर्माण होणारे बँकेचे दायित्व -
भूकंप, पूर, वादळ, वीज पडणे ह्यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे अथवा ग्राहकाच्या एकट्याच्या निष्काळजीपणामुळे लॉकरमधीज चीजवस्तूंचे काही नुकसान / हानी झाल्यास बँकेची जबाबदार राहणार नाही. तथापि अशा घटनांपासून बँकेच्या इमारतीचे संरक्षण व लॉकर यंत्रणेची योग्य ती काळजी बँक घेईल.

7.2 - आग, चोरी, दरोडा, लूटमार, इमारत कोसळणे अथवा बँक कर्मचाऱ्याने अपहार करणे यासारख्या घटनांमुळे निर्माण होणारे बँकेचे दायित्व -
सेफ डिपॉझीट वॉल्टस् जेथे ठेवलेले आहेत अशा इमारतीचे संरक्षण करणे व सुरक्षा पुरविण्यासाठी सर्व पावले उचलण्याची बँकेची जबाबदारी असेल. बँकेच्या स्वतःच्या चुकीमुळे, दुर्लक्ष केल्यामुळे, अथवा निष्काळजीपणामुळे आग, चोरी, दरोडा, लूटमार, इमारत कोसळणे यासारख्या घटना बँकेच्या आवारात होणार नाहीत याची काळजी घेण्याची जबाबदारी बँकेची राहील. लॉकरमधील चीजवस्तूंचे नुकसान झाल्याबल ग्राहकांप्रती बँकेचे काही दायित्व नाही असा दावा बँका करु शकत नसल्यामुळे, वरील नमूद घटनांमुळे अथवा बँक कर्मचाऱ्यांनी केलेल्या अपहारामुळे लॉकरमधील चीजवस्तुंना काही हानी पोहोचल्यास / नुकसान झाल्यास, लॉकरच्या प्रचलित वार्षिक भाड्याच्या 100 पट रकमेएवढी बँकेची जबाबदारी असेल.

## भाग 8 - जोखीम व्यवस्थापन, पारदर्शकता आणि ग्राहकांना मार्गदर्शन

8.1 - शाखेचा विमा करार
आग, लूटमार, नैसर्गिक आपत्ती, शाखेचे स्थलांतर / विलीनीकरण प्रक्रीयेदरम्यान झालेले नुकसान इ. मुळे होणारे नुकसान कमीत कमी होईल, ह्यासाठी संचालक मंडळाची मान्यता असलेली शाखांची विमा पॉलीसी असेल.

8.2 - लॉकरमधील चीजवस्तूंचा ग्राहकाने काढलेला विमा
ग्राहकाने लॉकरमध्ये ठेवलेल्या / काढलेल्या चीजवस्तूंची नोंद बँक ठेवत नसल्यामुळे, चीजवस्तूची कोणतीही जोखीम घेण्याचे दायित्व बँकेचे असत नाही अशी स्पष्टता असलेले कलम बँकेच्या लॉकर ॲग्रीमेंटमध्ये असेल. कोणत्याही परिस्थितीत बँक लॉकरमधील चीजवस्तूंचा विमा काढण्यासाठी त्याचे लॉकरधारकास प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे प्रस्ताव देणार नाही.

8.3 - ग्राहक मार्गदर्शन आणि जाहीरात

8.3.1 - जनसामान्यांना पाहता यावी म्हणून, बँकेने, सर्व अटी व शर्ती आणि स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजरसह त्यांचे मॉडेल लॉकर ॲग्रीमेंट त्यांच्या वेब साईटवर / ज्या शाखांमध्ये लॉकर सुविधा उपलब्ध केलेली आहे अशा शाखांमधून (अधिकृत वेब साईट नसल्यास) प्रदर्शित करण्यात येईल. सदर लॉकर सुविधेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना पुरेशी माहिती देण्यात आली आहे याची खात्री बँक करेल.

8.3.2 - सेफ डिपॉझीट लॉकर्स शुल्कांविषयीची अद्यावत माहिती बँक आपल्या वेब साईट / शाखांमधुन प्रदर्शित करण्यात येईल.

8.3.3 - धोरणे / लॉकर अथवा सेफ कस्टडी आर्टिकल्स मध्ये मयत लॉकरधारकाच्या / सेफ आर्टिकल कस्टडी ठेवीदाराच्या नामनिर्देशित व्यक्तिला / हयात कायदेशीर वारसांना प्रवेश देण्यासंदर्भातील कार्यपद्धती बाबत माहिती बँक आपल्या वेबसाईटवर प्रदर्शित करेल. तसेच याबाबतची छापील प्रत नामनिर्देशित व्यक्तिला / हयात लॉकरधारक / कायदेशीर वारसांना देण्यात येईल.

अंकेक्षण व तपासणी विभाग प्रमुख उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी.

परिशिष्ट 1 अ

Lockers

With Nomination

| Lockers in the Name of | Operational Instruction | Nominee | Situation | What is to be done. |
|---|---|---|---|---|
| A | Self | X | X dies | A can change the nomination |
| A | Self | X | A dies | X will given access to the locker and liberty to remove contents. |
| A,B | Jointly | X | A dies | B & X will be given access to the locker and liberty to remove |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | contents jointly. |
| A,B | Jointly | X | B dies | A & X will be given access to the locker and liberty to remove contents jointly. |
| A,B | Jointly | X | A & B dies | X will be given access to the locker and liberty to remove contents. |
| A,B | Jointly | X & Y | A dies | B along with X and Y will be given access to the locker and liberty to remove contents jointly. |
| A,B | Jointly | X & Y | B dies | A along wih X and Y will be given access to the locker and liberty to remove contents jointly. |
| A,B | Jointly | X & Y | A & B dies | X and Y will be given access to the locker and liberty to remove contents. |

<u>परिशिष्ट 1 ब</u>

<u>Without Nomination</u>

| Lockers in the Name of | Operational Instruction | Situation | What is to be done. |
|---|---|---|---|
| A | Self | A dies | Legal heirs of A or any of them mandated by any of them |
| A,B | Either or Survivor | A dies | B will be given access to the locker and liberty to remove contents. |
| A,B | Either or Survivor | B dies | A will be given access to the locker and liberty to remove contents. |

| | | | |
|---|---|---|---|
| A,B | Either or Survivor | A & B dies | Legal heirs of A & B ( or any of them mandated by all legal heirs) will be given access to the locker and liberty to remove contents jointly. |
| A,B | Jointly | A dies | B and legal heirs of A ( or any of them mandated by all legal heirs) will be given access to the locker and liberty to remove contents jointly. |
| A,B | Jointly | B dies | A and legal heirs of B ( or any of them mandated by all legal heirs) will be given access to the locker and liberty to remove contents jointly. |
| A,B | Jointly | A & B dies | Legal heirs of A & B ( Or any one of them mandate by all legal heirs) will be given access to locker and liberty to remove the contents. |